प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक १९/२०१८ | दिनांक ०६/०३/२०१८ | कालावधी ५ दिवस


**डॉ. सुभाष चव्हाण,** विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग ९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,** नोडल ऑफिसर, कृषिविद्या विभाग ९४२२३७४००१

**प्रा. विरेश चव्हाण,** तांत्रिक अधिकारी, कृषिविद्या विभाग ९४२२०६५३४४


| मागील हवामान सारांश दि. ०२/०३/२०१८ ते ०६/०३/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (०७/०३/२०१८ सकाळी ८:३० पासून ११/०३/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| हवामानांचे घटक | : | ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | १०/०३ | ११/०३ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३७ | ३६ | ३८ | ३७ | ३८ |
| किमान तापमान (अं.से) | : | २३ | २१ | २१ | २३ | २४ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | २ | २ | १ | २ | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६७ | ६७ | ६२ | ५३ | ५७ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | २२ | २३ | २४ | २५ | २२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००३ | ००२ | ००३ | ००४ | ००४ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक ७ ते ११ मार्च २०१८ पर्यंत अवकाश अंशतः मेघाच्छादित राहिल. दिनाकं ७ ते ११ मार्च, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग २ ते ४ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| कडधान्य पिके | वाढीची अवस्था | • तयार झालेल्या कडधान्य पिकांची सकाळी आणि संध्याकाळी काढणी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. |
| चिकू | वाढीची अवस्था | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• चिकू बी पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी डेल्टामेथ्रिन २.८ टक्के प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. द्रावणास स्टिकरचा वापर करावा. (सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.)<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने काढावीत. |
| नारळ/ सुपारी | —— | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्ड्यात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• सुपारीवर येणाऱ्या कोळेरोग (सुपारीची गळ) या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्राणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी किंवा फॉसिटील ए. एल. ०.३ टक्के (१० लिटर पाण्यात ३० ग्रॅम) अधिक युरिया सुफला युक्त १११ गोळया किंवा फॉसिटील ए. एल. ०.३ टक्के (१० लिटर पाण्यात ३० ग्रॅम) अधिक कोकण अन्नपूर्णायुक्त ७६ गोळया प्रती झाडास द्याव्या. |
| भाजीपाला आणि कलिंगड लागवड | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन | — | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे. |
| सुचना | — | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |